राज्यातील सहकारी रुग्णालयांच्या नोंदणीसाठी निकष/मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यासाठी समिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण -०५१७/प्र.क्र.५९/१३-स

मंत्रालय विस्तार इमारत,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २ नोव्हेंबर,२०१७.

प्रस्तावना :

राज्यामध्ये मुंबई, सोलापूर, अमरावती व नागपूर जिल्ह्यात सहकारी रुग्णालये कार्यरत असून, राज्यातील जनतेची आरोग्याची निकड लक्षात घेता सर्वसामान्य नागरीकांना वैद्यकिय सुविधा माफक दराने मिळण्यासाठी सहकारी रुग्णालयांच्या स्थापनेसाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सहकारी रुग्णालयांची नोंदणी करण्यासाठी काही निकष /मार्गदर्शक सुचना निश्चित करण्यासाठी समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

राज्यात विविध जिल्हयांसाठी सहकारी रुग्णालये स्थापन करण्याच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सहकारी रुग्णालयांची नोंदणी करण्यासाठी निकष/मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यासाठी या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिका-याचे नाव /पदाचे नांव	पदनाम	समितीवरील पदनाम
१.	डॉ. आनंद जोगदंड	अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था पुणे	अध्यक्ष
२.	डॉ. अर्चना पाटील	अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा ,पुणे	सदस्य
३.	श्री. नंदू लाड	चेअरमन, सुश्रुषा रुग्णालय, रानडे रोड, दादर (पूर्व)	सदस्य
४.	डॉ.विजयकुमार आरकाल	चेअरमन,श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र सोलापूर	सदस्य
५.	डॉ. राजेंद्र गणेडीवाल	रुग्णालय प्रमुख, धन्वंतरी सहकारी रुग्णालय,अमरावती.	सदस्य
६.	मुख्य आरोग्य अधिकारी	पिंपरी चिंचवड महानगरपालिका	सदस्य
७.	उपनिबंधक(सर्वसाधारण), सहकारी संस्था, पुणे	सहकार आयुक्त व निबंधक यांचे कार्यालय, सहकारी संस्था,पुणे	सदस्य सचिव

अ) उपरोक्त गठित करण्यात आलेल्या समितीने रुग्णालयांची नोंदणी करण्यासाठी काही निकष /मार्गदर्शक सुचना निश्चित करतांना पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे:-

१. रुग्णालयाची जागा निश्चित करतांना, जागेचे क्षेत्रफळ, वाहतुकीची सोय व स्थान.

२. बँका, सरकारी कर्मचारी तसेच शिक्षक, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सदस्य यांना सहकारी रुग्णालयाचे सभासद करुन घेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करुन सहकारी रुग्णालयासंदर्भात जागृकता निर्माण करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३. सहकारी रुग्णालयाचे व्यवस्थापन व सुविधा.

४.रुग्णालयाच्या इमारतीबाबतचे निकष.

५. प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक आजारांचा विचार करुन त्याप्रमाणे सुविधा निर्माण करणे.

६. वैद्यकिय अधिकारी त्यांची शैक्षणिक पात्रता तसेच मानधनावरील वैद्यकिय अधिकारी व आवश्यक कर्मचारी वृंद.

७. सहकारी रुग्णालयवरील समितीची रचना व तिची कार्यपध्दती .

८. सभासदांची किमान संख्या त्यांचे भागभांडवल.

९. रुग्णालयासाठी उपलब्ध निधी, देणग्या. कर्ज व जबाबदारी (liabilities), प्रवेश फी याबाबतचे निकष.

१०. सर्वसामान्य जनेतला माफक दरात आरोग्यसेवा मिळण्याच्या दृष्टीने आरोग्यसेवेचे दर.

११. वरील बाबी व्यतिरिक्त समितीला निकष /मार्गदर्शक सुचना निश्चित करण्याचे अधिकार असतील.

ब) सहकारी रुग्णालयांची नोंदणी करण्यासाठी निकष ठरविताना अशा पध्दतीने रुग्णालय चालविणा-या सेवाभावी संस्था व इतर संबंधित तज्ञ यांच्याशी समितीने सविस्तर चर्चा करावी.

क) समितीने वेळोवेळी आयोजित केलेल्या बैठकांच्या इतिवृत्ताच्या प्रतीसह निकष /मार्गदर्शक सूचना निश्चित करण्याबाबतचा अहवाल ४५ दिवसात शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय हा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२९/कुक,दिनांक २७.७.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या अभिप्रायांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११०३१२३७५२४८०२ असा आहे.हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Jayaram Choudhary

Digitally signed by Anil Jayaram Choudhary
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation Marketing And Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f26cf80358fa3133e4d85ddac30ae54b06c63743fd551 0dc0ebca082b6c483ce, serialNumber=d124ae9bbd15bed87dbd08ef779cf1b85a40203 39eb1c2ef0e112fb67063011c, cn=Anil Jayaram Choudhary
Date: 2017.11.03 12:28:30 +05'30'

(अनिल ज.चौधरी)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई.
२) अप्पर मुख्य सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई.
३) सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
४) सचिव,राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य,पुणे
५) सर्व सह/उप सचिव,सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
६) निवडनस्ती

प्रति,

१. डॉ. आनंद जोगदंड, समितीचे अध्यक्ष तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था पुणे.
२. डॉ. अर्चना पाटील, समिती सदस्य तथा अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा ,पुणे.
३. श्री. नंदू लाड, समिती सदस्य तथा चेअरमन, सुश्रुषा रुग्णालय, रानडे रोड, दादर (पूर्व).
४. डॉ.विजयकुमार आरकाल, समिती सदस्य तथा चेअरमन,श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र सोलापूर.
५. डॉ. राजेंद्र गणेडीवाल, रुग्णालय प्रमुख, धन्वंतरी सहकारी रुग्णालय,अमरावती.
६. डॉ. के. अनिल रॅाय, आरोग्य वैद्यकिय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,पुणे.
७. उपनिबंधक(सर्वसाधारण), सहकारी संस्था, पुणे